जा. क्र. लेप/त्रुटक कालावधीचे ऑडीट/अच-१/सन८७
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय.
दिनांक १५ एप्रिल १९८७.

विषय:- त्रुटक तथा खंडीत कालावधीचे अधिकृत हिशेब उपलब्ध नसल्यास तसेच लेख्यांची पुनर्रचना केली असल्यास किंवा पुनर्रचना करणे शक्य नसल्यास, अशा परिस्थितीत करावयाच्या लेखापरिक्षण कार्यवाहीबाबत

## परिपत्रक

### [१] त्रुटक कालावधीचे अधिकृत हिशेब उपलब्ध नसल्यास

अशा परिस्थितीत, लेखापरिक्षकाने इतर कागदपत्रे, हिशोबाची पुस्तके व उपलब्ध नोंदवह्या यांच्या आधारे हिशोबाच्या अधिकृतपणाबद्दल खात्री करुन घ्यावी. उदा. तेरीज पत्रकांना व्यवस्थापक समितीने संमती दिलेली आहे, [ज्यांत उपनिर्दिष्ट हिशोब समाविष्ट आहेत] तेरीजे पासबुकांतून झालेल्या व्यवहाराचा पडताळा बरोबर आहे, खर्चाला योग्य अधिकाऱ्याची मंजुरी आहे इत्यादि. अशाप्रकारे हिशोबाचे अधिकृतपणाबद्दल खात्री करुन होतल्याबद्दलचे अभिप्राय आपले लेखापरिक्षण अहवालांत स्पष्टपणे नमुद करावेत. वरील बाबतीत तपासाअंती उणीवा आढळून आल्यास किंवा खात्री करुन होता येत नसल्यास त्याबद्दलचे तपशीलवार अभिप्राय लेखा परिक्षण अहवालांत नमुद करावेत.

### [२] संस्थांचे हिशोबाची पुनर्रचना केली असल्यास किंवा करुन घ्यावयाची असल्यास

हिशोबाची किंवा लेख्यांची पुनर्रचना ही रजिस्टरींग ऑथॉरिटीने संस्थेच्या सहकार्याने करुन घ्यावयाची आहे. लेखापरिक्षकाने, प्रथम पुनर्रचना किंवा पुनर्रचनेकरिता व्यवस्थापक समितीने ठराव करुन संमती दिलेली आहे, ह्याची खात्री करुन घ्यावी लागेल. तसेच, पुनर्रचना केलेले हिशोब समाविष्ट असलेल्या हिशोबाची पत्रके [नफातोटा पत्रक, व्यापारी पत्रक व ताळेबंद] व्यवस्थापक समितीने मंजूर केल्यानंतर पुनर्रचना केलेले हिशोब अधिकृत समजले जावेत. पुनर्रचना केलेले व्यवहार सध्याचे संचालक मंडळाचे कारकीर्दीतील नसतील तर त्यावर मागील



जिल्हा विशेष लेखापरिक्षक,
सहकारी संस्था, सांगली.

INWARD No. 2549 OF 19
OFFICE OF THE

समितीचे अध्यक्ष/कार्यकारी संचालक त्यांच्या सह्या लागतील. सध्याचे संचालक मंडळाला देखील त्या हिशोबावर अधिकृतपणे सह्या करता येतील. त्यांनी प्रमाणपत्र देतांना त्यावर उल्लेख करावा कीं, हे हिशोब/ताळेबंद मागील संचालक मंडळाचे कालावधीचे आहेत.

पुनर्रचना केलेल्या हिशोबांचे लेखापरिक्षण केल्यानंतर लेखापरिक्षकाने सदरचे हिशोब कोणत्या बाबतीत व किती प्रमाणांत खरे व रास्त नाहीत याबाबतचे सुस्पष्ट अभिप्राय लेखापरिक्षण अहवालात निःसंदिग्धपणे नमूद करावेत.

[३] खंडीत कालावधीच्या हिशोबाची पुस्तके उपलब्ध नसल्यास, नाश पावली असल्यास किंवा मुद्दामहून नाश केली असल्यास व त्यांची पुनर्रचना करणे शक्य नसल्यास

---

हिशोबाची पूस्तके कोणत्याही परिस्थितीत उपलब्ध होऊ शकणार नाहीत व त्याची पुनर्रचनाही शक्य नाही असे असेल तर, लेखापरिक्षकाने या खंडीत काळाचे लेखापरिक्षण होण्यापुर्वी व्यवस्थापक समितीने देखील रेकॉर्डबद्दल खात्री करुन ठराव करणे आवश्यक राहील कीं, दप्तर मिळविण्याच्या दृष्टीने व्यवस्थापक समितीने सर्व प्रयत्न केल्यानंतर देखील दप्तर उपलब्ध होवू शकत नाही. अशाप्रकारचा ठराव केला असल्याची लेखापरिक्षकाने शहानिशा करुन घ्यावी.

अशावेळी नफातोटा व ताळेबंदाच्या खरेपणाबद्दल व रास्तपणाबद्दल मत प्रदर्शन करणे योग्य होणार नाही. त्यावेळी मत प्रदर्शन करण्यास असमर्थ आहे किंवा नफातोटा पत्रक व ताळेबंद खरी व रास्त परिस्थिती दर्शवित नाही, ह्या दोन पैकी कोणत्या पर्यायाचा अवलंब करावा हे त्या संबंधीत त्यावेळचे परिस्थितीवर अवलंबून राहील.

लेखापरिक्षकाचा अहवाल स्पष्ट, संक्षिप्त व निःसंदिग्ध असावा. स्वतःची बाजू व्यवस्थित दिग्दर्शित करणेकरिता लेखापरिक्षकास इतरही कांही मुद्द्यांचा लेखापरिक्षण अहवालामध्ये समावेश करता येईल. मात्र लेखापरिक्षण अहवाल देणेचे लेखापरिक्षकांस टाळता येणार नाही. निव्वळ हिशोबाचे पत्रकावर सह्या करुन लेखापरिक्षणाचे जबाबदारीतून मोकळे होता येणार नाही.

## [४] लेखापरिक्षकाचा अहवाल व क्वॉलिफीकेशन्स

१. सर्व क्वॉलिफिकेशन्स, लेखापरिक्षकाचे अहवालांत समाविष्ट करावेत.

२. जेथे शक्य असेल तेथे लेखापरिक्षकाने क्वालिफिकेशन्सचा हिशोब पत्रकांवर होणाऱ्या परिणामाच्या रकमांचे आंकडे नक्की व निःसंदिग्धरित्या निश्चित करावेत.

३. जेथे अशा रकमांचे आंकडे तंतोतंत निश्चित करणे शक्य नसेल तेथे व्यवस्थापनाने उचित पद्धतीचा अवलंब करुन, शास्त्रशुद्ध अंदाजाने निश्चित केली असेल तर, लेखापरिक्षकाने स्पष्टपणे नमुद करावे कीं, परिणामकारक रकमांचे आंकडे व्यवस्थापनाचे बाबतीतिल अंदाजावर आधारित आहेत.

४. लेखापरिक्षण अहवालातील ज्या बाबी संबंधी क्वालिफाईंग अभिप्राय असतील त्याबाबतीत ते समजले जातील. अशारितीने लेखापरिक्षण अहवालांत नमुद करावयास पाहिजे.

५. क्वालिफिकेशन्स परिणामकारकरित्या दिग्दर्शित होणेकरिता प्रचलित व मान्य अशा शब्दप्रयोगांचाच वापर करावा.

सहनिबंधक[लेखापरिक्षण]
सहकारी संस्था, महाराष्ट्रराज्य, पुणे.

प्रत माहिती करिता व आवश्यक त्या कार्यवाही करितां अग्रेषित -

[१] सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था [सस्नेह]
[२] सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था.
[३] सर्व विभागीय विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था.
[४] सर्व विशेष लेखापरिक्षक सहकारी संस्था, वर्ग १ व वर्ग २.
[५] सर्व सहनिबंधक, सहकारी संस्था[सतत व समवर्ती लेखापरिक्षण]
[६] सहकार आयुक्तांचे स्वीय सचीव.
[७] निवडसूची.

सहनिबंधक, सहकारी संस्था[लेखापरिक्षण]
महाराष्ट्रराज्य, पुणे.